# सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ तालुका

## यांचे कार्यालय

नवरे आर्केड, सत्यम टॉवर, २ रा मजला, शिव मंदिर रोड, अंबरनाथ (पूर्व) ता. अंबरनाथ, जिल्हा-ठाणे

जा.क्र.सनि/अंबरनाथ/श्री-२/सुर्योदय /क्रे.सो/६७९ /सन १७

दिनांक : १३ / ०६ / २०१७.

वाचावे :- १. या कार्यालयाचे आदेश क्रमांक सनि/अंबरनाथ/बी-४/सुर्योदय क्रेडीट सो./कलम ८३/२११८/सन ११ दिनांक २९/१/२०११ चे चौकशी अधिकारी नियुक्तीचे आदेश

२. या कार्यालयाचे आदेश क्रमांक सनि/अंबरनाथ/बी-४/सुर्योदय क्रेडीट सो./कलम ८३(५)/४२७/ सन ११ दिनांक २०/६/२०११ चे चौकशी अधिकारी बदलाचे आदेश

३. श्री. बी.के. दळवी, प्राधिकृत अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) सेवानिवृत्त यांचा दिनांक २०.०१.२०१२ चा कलम ८३ खालील चौकशी अहवाल.

४. या कार्यालयाचे आदेश क्रमांक सनि/अंबरनाथ/बी-२/सुर्योदय क्रे.सो./सन १२ दिनांक ३१/३/२०१२ चे कलम ८८ अन्वये चौकशी अधिकारी नियुक्तीचे आदेश

५. या कार्यालयाचे आदेश क्रमांक सनि/अंबरनाथ/बी-४/सुर्योदय क्रे.सो./सन १२ दिनांक १०/४/२०१२ व १३/०९/२०१२ रोजीचे चौकशी अधिकारी बदलाचे आदेश.

६. श्री. एल. एस. लष्कर, चौकशी अधिकारी तथा तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ यांनी दिनांक २१/१०/२०१३ रोजी सादर केलेला चौकशी अहवाल.

७. मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांचे क्रमांक विसनि/कोकण/वि ८/अपील क्र. ६७-१२/४२०८/सन २०१६, दिनांक ३०/११/२०१६.

८. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ मधील तरतूद.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे
५५६८
14 JUN 2017
बी-६

ज्याअर्थी दि सुर्योदय अर्बन को ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्लॉट नं. ३६०, कमलाकिंत, साई विभाग, अंबरनाथ (पूर्व) ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये नोंदणीकृत नागरी सहकारी पतसंस्था असून तिचा नोंदणी क्रमांक टीएनए/युएलआर/आरएसआर/(सीआर) /१३९८/२००२-२००३/सन २००२, दिनांक २/१०/२००२ असा आहे. आणि,

ज्याअर्थी या कार्यालयाचे वाचावे क्र. १ अन्वये या कार्यालयाने श्री राजेश लव्हेकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ यांची चौकशी अधिकारी यांची नियुक्ती केली होती. तद्नंतर वाचावे क्र. २ अन्वये श्री. बी.के. दळवी, प्राधिकृत अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) सेवानिवृत्त यांची नियुक्ती करणेत आली होती. आणि,

ज्याअर्थी श्री. बी.के. दळवी, प्राधिकृत अधिकारी तथा सहकारी अधिकारी (प्रथम श्रेणी) सेवानिवृत्त यांनी दिनांक २०.०१.२०१२ चा कलम ८३ खालील चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर चौकशी अहवालामध्ये चौकशी अधिकारी यांनी झालेले नुकसानीची चौकशी करणे अपेक्षित होते. परंतू त्यांनी जबाबदार व्यक्तींची नांवे निश्चित केलेली आहेत. सदरील जबाबदार व्यक्तींची नांवे नमूद केलेला भाग वगळून त्यांचा चौकशी अहवाल मान्य करणेत आलेला आहे. चौकशी अधिकारी यांनी नमूद केलेल्या नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी अधिकारी नेमणे आवश्यक असल्याने संदर्भ क्र. ४ व ५ अन्वये चौकशी अधिकारी नियुक्ती करणेत आली. आणि,

ज्याअर्थी श्री. एल. एस. लष्कर, चौकशी अधिकारी तथा तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ यांनी दिनांक २१/१०/२०१३ रोजी सादर केलेला कलम ८८ खालील चौकशी अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. आणि,

ज्याअर्थी सदर चौकशी अहवालाविरुध्द अर्जदार श्री. प्रसाद वामन बेर्डे यांनी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई यांचेकडे अपील दाखल केले होते त्या अपीलाचा निर्णय संदर्भ क्रमांक ७ च आदेशाने झाला असून त्यात अर्जदारांचे अपील अंशत: मान्य करुन श्री. एल. एस. लष्कर, चौकशी अधिकारी तथ तत्कालीन सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंबरनाथ यांनी दिनांक २१/१०/२०१३ रोजी सादर केलेला कलम ८ खालील चौकशी अहवाल रद्द केलेला आहे. आणि,

Scanned by CamScanner

ज्याअर्थी उपरोल्लेखित आदेशाने या कार्यालयास नविन चौकशी अधिकारी नेमून फेरचौकशी करणेसाठी प्रकरण प्रतिप्रेषित केलेले आहे. आणि,

त्याअर्थी सुर्योदय अर्बन को ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. अंबरनाथ (पूर्व) या संस्थेतील तत्कालीन संचालक मंडळाचे गलथान कारभारामुळे गैरव्यवहार झालेला असून संस्थेचे आर्थिक नुकसान निश्चित करणे गरजेचे असल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशीसाठी प्राधिकृत अधिकारी नियुक्तीचा आदेश खालीलप्रमाणे देत आहे.

## -: आदेश :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार दि सुर्योदय अर्बन को ऑप. क्रेडीट सोसायटी लि. प्लॉट नं. ३६०, कमलाकिंत, साई विभाग, अंबरनाथ (पूर्व) ता. अंबरनाथ, जिल्हा ठाणे या संस्थेच्या सन २००४-०५ ते २००८-०९ या कालावधीतील गैरव्यवहाराबाबत श्री बी.के. दळवी, प्राधिकृत अधिकारी यांचे चौकशी अहवालातील सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये दर्शविलेल्या आर्थिक नुकसानीस जबाबदार असलेले पदाधिकारी व त्यांचे वारसदार यांचेकडून सदर रक्कम व्याजासह वसुल करणेसाठी श्री. एस.एस. तोटे, सेवानिवृत्त जिल्हा विशेष लेखापरिक्षक, यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यांत येत आहे.

प्राधिकृत अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ व नियम १९६१ चा नियम ७२ (२) अन्वये तसेच सहकार खात्याकडून वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन तसा अहवाल तीन महिन्यांचे आंत सादर करावा.

**प्रस्तूत आदेश आज दि.१३/०६/२०१७ रोजी माझी सही व शिक्क्यानिशी दिला आहे.**

दिनांक :- १३ /०६/२०१७
ठिकाण :- अंबरनाथ,

(सुधाकर मोहिते)
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था अंबरनाथ तालुका.**

प्रति,

Scanned by CamScanner